**महाराष्ट्र विधानसभा**

**पत्रक भाग दोन**

**सोमवार, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२० / फाल्गुन ५, १९४१ शके**

**निदेश क्रमांक : २०*** **औचित्याचे मुद्दे**

**१६. औचित्याचे मुद्दे स्वीकारण्याबाबत सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की :-**

महाराष्ट्र विधानसभा नियमातील नियम ५८ मध्ये असलेल्या तरतुदींनुसार औचित्याच्या मुद्दयाबाबत स्वीकृतीचे व कार्यपध्दतीचे निकषाबाबत मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी पुढीलप्रमाणे निदेश दिले आहेत.

**अ- स्वीकृतीचे निकष**

(१) औचित्याचा मुद्दा स्विकार्य व्हावा यासाठी म.वि.स. नियम ७० मध्ये नमूद केलेले नियम लागू राहतील.

(२) सूचना ज्या बाबीसंदर्भात त्याच अधिवेशनात चर्चा झाली असेल किंवा ज्या बाबींचे स्वरुप वस्तुत: या नियमाखाली एखादया सदस्याने अधिवेशन काळात अगोदर उपस्थित केलेल्या बाबीसारखेच असेल अशा बाबीसंबंधी नसावी.

(३) सूचनेतील विषय एकाच विभागाशी सलग्न असावा व त्यात एकापेक्षा जास्त मुद्दे उपस्थित करता कामा नये.

(४) पक्ष निहाय, एका सदस्याचा एकच तसेच एका बैठकीत जास्तीत जास्त एकूण १० औचित्याचे मुद्दे मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभागृहात मांडण्यास परवानगी देण्यात येईल.

(५) मा. सदस्यांना औचित्याचा मुद्दा सारांश रुपात मांडावा लागेल, तसेच सभागृहामध्ये कोणताही विवादास्पद मुद्दा उपस्थित करता येणार नाही.

(६) मा. मंत्री महोदयांच्या स्वाक्षरीने सदर मुद्दयाचे लेखी उत्तर ३० दिवसांच्या आत संबंधीत सदस्यांस तसेच महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयास पाठविणे शासनास बंधनकारक राहिल.

(७) संपूर्ण अधिवेशनामध्ये उपस्थित झालेले औचित्याचे मुद्दे व या मुद्दयाच्या अनुषंगाने संबंधित मंत्री महोदयांनी सदस्यांना पाठविलेले उत्तर याबाबतची एकत्रित माहिती संसदीय कार्य विभाग यांनी अधिवेशन संपल्यानंतर एका माहिन्याच्या आत एकत्रित करुन मा. अध्यक्ष यांच्या माहितीसाठी पाठवतील.

(८) मा. सदस्यांना सभागृहात औचित्याचा मुद्दा मांडण्यास संधी मिळाली नसल्यास त्यांच्याकडून प्राप्त झालेल्या सर्व सूचना सत्र समाप्तीनंतर व्यपगत होतील.

..२/-

## ब- कार्यपध्दतीचे निकष

(१) सदस्यास निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या कोणत्याही बाबींसबंधातील विषय औचित्याचा मुद्दा म्हणून सभागृहात मांडता येईल. सदस्यांना सूचना दयावयाची असल्यास PROIS या संगणक प्रणालीव्दारे संपुर्णत: ऑनलाईन (online) पध्दतीने सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत या सचिवालयाकडे पाठवाव्यात.

(२) प्रत्येक सदस्यास संपूर्ण अधिवेशन कालावधीत जास्तीत जास्त एकूण ५ मुद्दे देता येतील.

(३) दर मंगळवारी व गुरुवारी मा.अध्यक्ष औचित्याचे मुद्दे सभागृहात उपस्थित करण्यास अनुमती देतील.

(४) औचित्याचा मुद्दा सभागृहात सदस्यांनी मांडल्यानंतर त्यावर मा. मंत्री महोदयांनी त्वरीत निवेदन करण्याची सक्ती नाही तसेच सदस्य मुद्दा मांडत असताना संबंधित विभागाच्या मंत्र्यांनी सभागृहामध्ये हजर राहण्याचे बंधनही राहणार नाही.

(५) सदस्यांनी औचित्याचा मुद्दा मांडल्यानंतर मा. मंत्री महोदयांना लगेच काही स्पष्टीकरण करावयाचे असल्यास अध्यक्षांच्या परवानगीने ते करु शकतील. मात्र त्यावर कोणतीही अनुपूरक प्रश्नोत्तरे होणार नाहीत.

---

* दिनांक २८ जानेवारी, २०२० रोजी दिला.

**विधान भवन,**
**मुंबई**
**दिनांक : २४ फेब्रुवारी, २०२०**

**राजेन्द्र भागवत,**
**सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत:-**

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव.
३. मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव.
४. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष.
५. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील पक्ष कार्यालये.
६. संगणक कक्ष (WEBSITE)
७. एम.के.सी.एल कक्ष (MKCL)